वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. १६ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# आ.संदीप क्षीरसागर पुन्हा अजित पवारांना भेटले

## चर्चांना उधाण, पण समोर आलं वेगळं कारण!



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

बीड, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे बीड मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी आज पुन्हा एकदा राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात ही भेट झाली. मागील काही दिवसांत आमदार क्षीरसागर हे दुसऱ्यांदा अजित पवारांना भेटल्याने राजकीय तर्क-वितर्क लढवले जात होते. मात्र स्वत: अजित पवार यांनीच या भेटीमागील कारण सांगितलं आहे.

बीड शहरात मागील २१ दिवसांपासून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याने आमदार म्हणून संदीप क्षीरसागर मला भेटले. ते दुसऱ्या पक्षाचे असले तरी काहीही ब्रेकिंग न्यूज चालवू नका, असं अजित पवार माध्यमांना उद्देशून म्हणाले.दरम्यान, मी बीड जिल्ह्याचा पालकमंत्री आहे. बीड विधानसभा मतदारसंघात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याने संदीप क्षीरसागर मला शोधत इथं आले, असंही अजित पवारांनी म्हटलं आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या काही नेत्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीशी सलगी साधण्यास सुरुवात केली आहे की काय, या चर्चेनं जोर धरला आहे. कारण सोलापूर जिल्ह्यातूनही काही

▶▶ पान २ वर

# लाडकी बहीण योजनेसाठी फक्त याच महिला पात्र

## अजित पवारांकडून लाडकी बहिण योजनेसाठी नवीन नियमावली

मुंबई ,(दिव्य न्युज):- ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने लाडकी बहीण ही योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. गेल्या जुलैपासून या योजनेच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. आतापर्यंत एकूण सात हाफ्ते महिलांच्या खात्यामध्ये जमा झाले आहेत, आता लवकरच फेब्रुवारीचा हाफ्ता देखील महिलांच्या खात्यात जमा होऊ शकतो.

ही योजना सुरू करतानाच योजनेसाठी काही अटी देखील होत्या. या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचं उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी असावं. लाभार्थी महिलेचं वय ६५ वर्षांपेक्षा जास्त नसावं. तसेच इतर देखील काही अटी होत्या. मात्र काही महिलांकडून या निकषात बसत नसताना देखील योजनेचा लाभ घेण्यात आला. ही गोष्ट लक्षात येताच आता ज्या महिला या योजनेत बसत नाहीत अशा सुमारे पाच लाख महिलांना योजनेतून वगळण्यात आलं आहे.



आता या योजनेबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठी अपडेट दिली आहे.शेतकाम करणारी महिला, धुणीभांडी करणारी महिला, स्वयंपाक करणारी महिला, गरीब महिला, भाजी विकणारी महिला यांच्यासाठी लाडकी बहीण योजना आणली आहे. ज्या महिलांचं महिन्याचं उत्पन्न हे वीस हजार रुपये आहे, अशा महिला या योजनेसाठी पात्र आहेत. ज्या महिलांना इतर कुठलाच लाभ मिळत नाही, अशा महिलांसाठी ही योजना आहे. आधी अशी चर्चा सुरू होती, की ज्या महिलांना लाभ घ्यायचा आहे त्यांना दोनच अपत्य असावीत. मात्र नंतर असं लक्षात आलं, ज्या महिलांचा पगार हा चाळीस हजार रुपये आहे, घरी चारचाकी गाडी आहे, अशा महिला देखील या योजनेचा लाभ घेत आहेत. मात्र आता जो लाभ दिला आहे, तो परत घेणार नाही. लाभ दिला आहे तो परत घेणार नाही, भाऊबीज, राखी पौर्णिमा भेट परत घेण्याची संस्कृती आपली नाही. काही महिलांनी नावं मागे घेतली आहेत, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आ.सुरेश धस यांच्या पाठिशी

## धनंजय मुंडे-धस भेटीबाबत मुख्यमंत्री स्पष्ट बोलले

मुंबई ,(दिव्य न्युज):- राज्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून मंत्री धनंजय मुंडे आणि भाजप आमदार सुरेश धस यांच्या भेटीवरुन चर्चा रंगली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आवाज उठवणारे आमदार सुरेश धस हे मंत्री धनंजय मुंडे यांनी भेटल्यामुळे मनोज जरांगेसह विरोधकांनी आमदार धस यांना लक्ष केले आहे. या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जळगावातून प्रतिक्रिया देत




विरोधकांना टोलवले आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे, हा हेतू ठेवून आमदार सुरेश धस काम करत आहे. या प्रकरणात ते पुढाकार घेत असल्यामुळे काही लोकांच्या पोटात दुखत आहे, असा टोला मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना लगावला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कोण कुणाला भेटले याच्यावर जर अशा पद्धतीचा राजकारण होत असेल तर ▶▶ पान २ वर

# नवी दिल्लीत रेल्वे स्टेशनवर चेंगराचेंगरी

## ४०० जागांसाठी दर तासाला १५०० तिकिटांची विक्री;१८ प्रवासी ठार



नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवर झालेल्या चेंगराचेंगरीत कुंभमेळ्यासाठी निघालेल्या १८ भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. मात्र, ही चेंगराचेंगरी नेमकी कशामुळे झाली याचं धक्कादायक कारण समोर आलं आहे.

दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रयागराज एक्सप्रेस प्लॅटफॉर्म क्रमांक १४ वर प्रवशांनी मोठ्या प्रमाणात गर् केली होती. त्यातच स्वतंत्रा सेनानी एक्सप्रेस आणि भुवनेश्वर राजधानी या दोन्ही गाड्या उशीरा धावत होत्या. या गाड्यांची वाट पाहणारे सर् प्रवासी १२,१३ आणि १४ नंबरच्या प्लॅटफॉर्मवर उभे होते.

यावेळी गाडी येताच प्रवाशांनी चढण्याचा प्रयत्न केला असता १४ आणि १६ प्लॅटफॉर्म क्रमांक जवळील एस्केलेटरजवळ चेंगराचेंगरी झाली. धक्कादायक बाब म्हणजे ४०० जागांसाठी रेल्वेने दर तासाला १५०० जनरल तिकटांची विक्री केल्याची माहिती समोर आली आहे.

त्यामुळेच गर्दी अनियंत्रित झाली आणि ही दुर्घटना घडली आहे. त्यामुळे आता या दुर्घटनेला जबाबदार कोण? आणि ४००

पान २ वर

### - चेंगराचेंगरीत मृत्यू झालेल्यांची नावे -

आहा देवी (बिहार) वय ७९ वर्षे, पिंकी देवी (दिल्ली) वय ४१ वर्षे, शीला देवी (दिल्ली) वय ५० वर्षे, व्योम (दिल्ली) वय २५ वर्षे, पूनम देवी (बिहार) वय ४० वर्षे, ललिता देवी (बिहार) वय ३५ वर्षे, सुरुची शाह (मुजफ्फरपूर, बिहार) वय ११ वर्षे, कृष्णा देवी, (बिहार) वय ४० वर्षे, विजय साह (बिहार) वय १५ वर्षे, नीरज पासवान (बिहार) वय १२ वर्षे, शांती देवी, (बिहार) वय ४० वर्षे, पूजा कुमार (बिहार)वय ८ वर्षे, संगीता मलिक, (हरियाणा) वय ३४ वर्षे, पूनम सिंग वय ३४ वर्षे तर ममता झा (४०) रिया सिंग (७), बेबी कुमारी (२४) पंचदेव कुशवाह (४७) हे सर्व राहणार दिल्ली अशी या मृतांची नावे आहेत.




# अभिमानास्पद



माहूर तालुक्याचे सीआरपीएफ जवान कोब्रा कमांडो शाहरुख फारूखी यांची राष्ट्रपती पराक्रम पदकासाठी निवड झाली आहे.याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. दिनांक ११/१/२०२३ रोजी झारखंड मधील जंगलामध्ये नक्सल विरोधी शोध मोहिमे दरम्यान दहशत वाद्यानी घडवून आणलेल्या आयडीडीब्लास्टमध्ये गंभीर जखमी झाले असतांना त्यांनी स्वतः बरोबरच आपल्या साथीदारांचेही रक्षण केल्यामुळे त्यांच्या या असामान्य कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रपती पराक्रम पदक देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

# बँकॉकला नेमका कोणता उद्योग करायला चिरंजीव गेले होते?

आपण मंत्री प्रिय तानाजी सावंत, जय महाराष्ट्र.

मुलातर प्रेम असावे, तर आपल्यासारखे. मुलावर धाक असावा तर तो देखील आपल्यासारखा, मुलाला बापाची चप्पल मालता येऊ लागली की, बापाने मुलासोबत मित्रासारखे वागावे, असे म्हणतात या न्यायाने आपण आपले चिरंजीव ऋषिकेश याच्याबाबतीत जे काही केले, त्याला तोड नाही, आपण एकनाथ शिंदे यांच्या अत्यंत जतलचे. त्यामुळे काही लोक आपल्या विरुद्ध कटकारस्थान करतील. अनेक शंका-कुशंका व्यक्त करतील, मात्र, तुम्ही त्याकडे लक्ष देऊ नका. आपले विरोधक आपल्यावर खूप प्रेम करतात हे लक्षात ठेवा.. गावात या विषयावर चर्चा सुरू होती, तेव्हा शामरावांनी आम्हाला काही प्रश्न विचारले. भविष्यात है प्रश्न आपल्याला त्रास देतील. म्हणून आत्ताच तुम्हाला कळवून ठेवतो. म्हणजे कोणी विचारले, तर तुम्हाला उत्तरे देता आली पाहिजे. तुमधी अदचण होऊ नये, या प्रेमापोटी हे पत्र आपल्याला लिहीत आहे.

पुणे पोलिसांना निनावी फोन करून अपहरणाची माहिती कोणी दिली? पोलिसांना चुकीची माहिती देणे हा भारतीय न्याय संहितेनुसार जुन्हा होती का?, त्यामुळे हा फोन नेमका कोणी केला?, आपली अडचण करण्याचा तर यामागे डाव नव्हता ना, हे आधीच तपासून ठेवा. परदेशात जाण्यासाठी जर खासगी विमान करायचे असेल, तर त्याला दिल्लीपासून गल्लीपर्यंत परवानग्या घ्याव्या लागतात. आपल्या मुलाला या परकनग्या पटापट मिळाल्या.. आम्हाला कलेक्टर ऑफिसमध्ये सेतू केंद्रावर रेशन कार्डसाठी महिनाभर चकरा माराव्या लागतात, असे जर कोणी म्हणाले, तर त्याचे उत्तर तयार ठेवा. उगाच आपली अडचण नको.. आपल्या चिरंजीवांनी बैंकॉकला जाण्यासाठी घेतलेल्या सगळ्या परवानग्यांची एक फाइलच बनवून ठेवा. बैंकॉकमध्ये ते कुठे सहणार होते? कोणत्या उद्योग वाढीचा विचार त्यांच्या मनात होता? याचेही उत्तर तयार ठेवलेले बरे..

पान १ वरून

## संदीप क्षीरसागर

नेते उमेदवारीसाठी शरद पवार गटाकडे गेले आणि निवडूनही आले होते. पण आता सत्ता महायुतीची असल्याने शरद पवार गटातील आमदार आता अजितदादांकडे जात आहे. माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी निवडणुकीत अजितदादांवर टीका केली होती. नुकतेच त्यांनी अजितदादांची भेट घेतली. त्यांच्यासोबत माढ्याचे आमदार अभिजीत पाटील आणि उमेश पाटीलही होते. यापूर्वी मोहोळचे आमदार राजू खरे यांनी आपण नावालाच शरद पवार गटाकडे असून आमचीच सत्ता आहे, असे जाहीरपणे बोलले होते. त्यामुळे निवडून आलेल्या आमदारांपैकी अनेकजण आता सत्तेसोबत जाण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र

लोकशाहीमध्ये ते योग्य नाही. लोकशाहीमध्ये संवाद हा सुरू राहिला पाहिजे. सुरेश धस यांनी या प्रकरणांमध्ये गंभीर भूमिका घेतलेली आहे. ती सर्वांनी बघीतली आहे. ते गंभीर भूमिका घेत असताना त्या माध्यमातून संवादच तोडून टाकायचा असे करणे योग्य नाही. शेवटी धनंजय मुंडे हे सुद्धा राज्याचे मंत्री आहेत. त्यामुळे एखादा आमदार, एखाद्या मंत्र्याला भेटला तर काही फरक पडत नाही.खासदार संजय राऊत यांच्याबद्दल विचारलेल्या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस यांनी एका वाक्यात उत्तर दिले. ते म्हणाले, मुर्खांना मी उत्तर देत नाही. हे माहीत असतानाही तुम्ही हा विचारतात, असे ते म्हणाले. अमृता फडणवीस यांच्या गाण्याबाबत बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, संत सेवालाल महाराजांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर ते गाणे रिलीज झाले आहे. फक्त बंजाराच नाही तर सर्व समाजाला ते गाणे आवडलेले आहे. एक प्रकारे ते आपल्या गुरूंच्या प्रती, संतांच्या प्रती एक आराधना आहे.

## नवी दिल्लीत

जागांसाठी रेल्वेने दर तासाला १५०० तिकीटांची विक्री का केली? असे अनेक सवाल आता उपस्थित केले जात आहेत.दरम्यान, नुकतंच मौनी अमावस्येच्या दिवशी प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी झाली होती. ज्यामध्ये ३० भाविकांचा मृत्यू झाला होता. अशातच आता नवी दिल्लीतील घटनेत १८ भाविकांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे प्रशासनाकडून गर्दीवर नियंत्रण करण्यासाठी काही उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

